# मुंबई विद्यापीठ

**तात्काळ**

**माहिती अधिकार व विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष,**

क्र.आरटीआयसी/आयसीसी/२०१६-१७/२

दिनांक : २८ डिसेंबर, २०१६

विषय :- माहितीचा अधिकार कार्यकर्ते श्री. भूपेंद्र वीरा यांची मुंबईत हत्या - श्री. शैलेश गांधी, मुंबई यांची तक्रार - मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचे अदेश

परिपत्रकः-

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभागप्रमुख, प्रभारी ग्रंथपाल, वित्त व लेखाअधिकारी, प्रभारी परीक्षा नियंत्रक, प्रभारी प्राचार्य सर ज.जी.वास्तुशास्त्र महाविद्यालय, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामग्री आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभाग/कक्ष प्रमुख, यांना कळविण्यात येते की, श्री. पा. म. ताकट, उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, यांचे पत्र क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र १५७-१६/ आस्था -२ दि. २८/११/२०१६(प्रत संलग्न) रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या आदेशानुसार श्री. भूपेंद्र वीरा, माहितीचा अधिकार कार्यकर्ते यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये केलेले अर्ज आपल्या विभागात प्रलंबित असतील अशा अर्जावर त्वरीत कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा तसेच ज्या अर्जावर कार्यवाही केलेली आहे त्याचा अहवाल माहिती अधिकार कक्षास तात्काळ सादर करावा जेणे करून सर्व माहितीचे संकलन करून अहवाल शासनास सादर करता येईल.

२८/१२/१६

डॉ. एम. ए. खान
कुलसचिव

मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २८/१२/२०१६

सोबतः वरीलप्रमाणे

प्रति,
विद्यापीठातील विभागाचे संचालक / विभाग प्रमुख,
सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य,
विद्यापीठ ग्रंथालयाचे ग्रंथपाल,
परीक्षा नियंत्रक, प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
सर्व उपकुलसचिव, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामग्री,
विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि
कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे / कक्षांचे प्रमुख

(अ) प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषितः-

१. संचालक, जमनालाल बजाज शिक्षण संस्था,
२. संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ,
३. संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग,
४. संचालक, शारिरीक शिक्षण आणि क्रिडा,
५. संचालक, आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग,
६. प्राध्यापक-नि-संचालक, दूर शिक्षण संस्था,

महाराष्ट्र शासन PA to VC

दूरध्वनी क्र.०२२-२२८५५७६६

क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र.१५७-१६/आस्था-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
७ था मजला, ४३१ ( विस्तार ),
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक . २८. ११.२०१६.

UNIVERSITY OF MUMBAI IS/ICD/ECD/201 05 DEC 2016 29610

प्रति,

उपसचिव ( महाविद्यालयीनशिक्षण /विद्यापीठशिक्षण / तंत्रशिक्षण / कला / ग्रंथालये),
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
संचालक ( उच्चशिक्षण / तंत्रशिक्षण / कला / ग्रंथालय ), महाराष्ट्र राज्य.
कुलगुरु, सर्व अकृषिक विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

विषय : माहितीचा अधिकार कार्यकर्ते श्री.भूपेंद्र वीरा यांची मुंबईत हत्या-
श्री.शैलेश गांधी, मुंबई यांची तक्रार-मा.राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचे आदेश...

उपरोक्त विषयाबाबतचे सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.५८८/१६/का.सहा, दि.२९.१०.२०१६ रोजीचे पत्र व त्यासोबतच्या सहपत्रांसह सोबत जोडले आहे.

माहितीचा अधिकार कार्यकर्ते श्री.भूपेंद्र वीरा यांची मुंबईत हत्या झालेली आहे. सदर बाबीची दखल घेण्याची व अशा प्रकारच्या हिंसाचाराच्या बाबी मुंबईत घडू नयेत यासाठी कार्यवाही करण्याची विनंती श्री.शैलेश गांधी, मुंबई यांनी मा. राज्य माहिती आयुक्त यांचेकडे केली आहे. त्यासाठी श्री.वीरा यांच्या हल्लेखोरांना अटक करणे, श्री.वीरा यांच्या कुटूंबाला संरक्षण देणे, श्री.वीरा यांनी ज्या-ज्या विभागात माहितीसाठी अर्ज केले आहेत व जे प्रलंबित आहेत त्यांची माहिती उपलब्ध करुन देण्याची विनंती श्री.गांधी यांची आहे.

तरी विभागाच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांतील श्री.वीरा यांनी माहितीसाठी अर्ज केले असतील व जे प्रलंबित असतील अशा अर्जांवर कार्यवाही करण्याबाबत संबंधीतांच्या निदर्शनास आणावेत व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सामान्य प्रशासन विभागास तात्काळ सादर करावा तसेच या कार्यासनासही अवगत करण्यात यावे. ही विनंती.

आपला,

( पा.म.ताकटे )
उप सचिव , महाराष्ट्र शासन

CE
Registrar/PRO (RTI)
A.R (RTI)
VC 7-12-2016

C:\Users\...\Documents\क्र CR_ ..._2016.docx